दै. लोकसत्ता

4 JUL 2017

# पिंपरी पालिकेने अडवलेला 'पीएमपी'चा सहा कोटींचा निधी अखेर मंजूर

## तुकाराम मुंढे यांच्या अभिनंदनाचा ठराव

प्रतिनिधी, पिंपरी

**पिंपरी महापालिकेने** अडवून ठेवलेला 'पीएमपी'ला सहा कोटी देण्याचा प्रस्ताव स्थायी समितीने अखेर मंजूर केला आहे. पीएमपीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक तुकाराम मुंढे महापालिकेत आल्याशिवाय पैसे देणार नाही, अशी भूमिका पालिका पदाधिकाऱ्यांनी घेतली होती. यावरून दोहोंमध्ये संघर्ष झाला. पुढे, 'चाय पे चर्चा' होऊन त्यांच्यात सुसंवादही घडला. बदलत्या परिस्थितीत निधीला मान्यता देतानाच पिंपरी पालिकेने मुंढे यांच्या अभिनंदनाचा ठरावही मंजूर केला आहे.



तुकाराम मुंढे

'पीएमपी'च्या विविध मुद्द्यांवरून पिंपरीतील पदाधिकारी व मुंढे यांच्यात बरेच दिवसांपासून संघर्ष सुरू होता. त्यामुळे त्यांच्यात कटुता निर्माण झाल्याचे चित्र निर्माण झाले होते. पीएमपीला देण्यात येणाऱ्या सहा कोटीचा प्रस्ताव विषय चार बैठकांमध्ये तहकूब ठेवण्यात आला होता. मुंढे यांनी स्थायी समितीच्या बैठकीस हजर राहावे, सदस्यांच्या शंका तसेच प्रश्नांना उत्तरे द्यावीत, त्यानंतरच हा विषय मंजूर होईल, अशी भूमिका स्थायी समितीने घेतली होती. तथापि, हे दबावतंत्र मुंढे यांनी झुगारून लावले होते. दरम्यान, मुंढे यांनी पिंपरीतील पदाधिकाऱ्यांना चहाचे निमंत्रण दिले. त्यानिमित्ताने 'पीएमपी' कार्यालयात बैठकही झाली. जवळपास दोन तासाच्या चर्चेत पीएमपीच्या विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा झाली. मुंढे यांनी पदाधिकाऱ्यांचे म्हणणे ऐकून घेतले. त्यांनी उपस्थित केलेल्या पिंपरीतील विविध मुद्द्यांचा विचार करून योग्य ती कार्यवाही करण्याची ग्वाही मुंढे यांनी दिली. त्यानंतर दोहोंमधील कटुता कमी झाली. त्याचा परिणाम म्हणून बरेच दिवस अडवून ठेवलेला सहा कोटींचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. त्याचप्रमाणे, सदस्यांच्या बहुतांश मागण्या मान्य केल्याचे सांगत मुंढे यांच्या अभिनंदनाचा ठरावही मंजूर केला.